# करिअरिस्टिक वुमन घडवणारे

# कमला कॉलेज

**आदर्श गृहिणी व्हा...किंवा करिअररिस्टीक वूमन किंवा जग जिंकणारी खेळाडू व्हा, किंवा कर्तव्यदक्ष प्रशासकीय अधिकारी... जे ध्येय असेल तिथंपर्यंत पोहोचण्याचं शिक्षण मुलींना देणारे कॉलेज अशी जर कमला कॉलेजची व्याख्या केली तर ती योग्यच होईल.**



एक स्त्री शिकली तर कुटुंब शिकेल या ध्येयाने सुरु झालेल्या ताराराणी विद्यापीठाची एक शाखा म्हणून गेली ६७ वर्षे मुलींना शिक्षणाची कवाडे खुली करत कार्यरत आहे. मुलींचे कॉलेज ही संकल्पना जेव्हा स्वातंत्र्यपूर्व काळात स्वीकारण्यातच अडचणी होत्या तेव्हा कै. व्ही.टी.पाटील आणि त्यांच्या पत्नी कै. सौ. सरोजिनीदेवी पाटील यांनी स्वमालकीची तब्बल ४० लाखाहून अधिक किमतीची जागा ताराराणी विद्यापीठासाठी दिली. अवघ्या २२ विद्यार्थिनींसोबत सुरु केलेल्या या संस्थेत आज तिन्ही शाखेत अडीच हजार मुली शिक्षण घेवून प्रगतीची शिखरे पादाक्रांत करत आहेत.

**करिअरच्या वाटा**

कला, वाणिज्य आणि विज्ञान या पारंपरिक शिक्षणशाखांसोबत मुलींसाठी करिअरचे नवे ऑप्शन निर्माण व्हावेत यासाठी अनेक वेगळे कोर्सेस सुरु करण्यात 'कमला'चा नेहमीच पुढाकार आहे. मुळात स्त्री कितीही शिकली आणि मोठ्या पदावर पोहोचली तरी तिच्यात आदर्श गृहिणीचे गुण असलेच पाहिजेत याचाही विचार कमला कॉलेज व्यवस्थापनाने खूप आधी केला आहे. म्हणूनच गृहशास्त्र विभाग हा कमलामधील वेगळा विचार करण्याचे द्योतक ठरतो. आहारतज्ज्ञ बनून आज कित्येक मुली यशस्वी झाल्या आहेत. निरोगी आरोग्याचे तंत्र योगशास्त्रात आहे. त्यामुळे कमलामध्ये सुरु असलेल्या पी.जी. डिप्लोमा इन योगा थेरपी हा एक वर्षाचा कोर्स सुरु करण्यात आला आहे. हा कोर्स करुन बाहेर पडलेल्या अनेक विद्यार्थिनी आज योगाचे क्लासेस घेवून करियर करत आहेत. स्पोर्टस असो किंवा स्पर्धा परीक्षा, तसेच वक्तृत्व स्पर्धा असोत किंवा एनएसएस शिबिरे, 'कमला'च्या मुली क्षेत्र गाजवूनच परत येतात हे समीकरण आहे.

**सुविधांतही पुढे**

समृध्द ग्रंथालय, मुलींसाठी सुरक्षित वसतिगृह, अभ्यासिका, खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी जिमखाना, विविध शाखांसाठी आधुनिक उपकरणांनी सुसज्ज प्रयोगशाळा, कॅंमसमध्येच असलेले कॅंटीन, बॅंक सुविधा अशा मुलींसाठी उपयुक्त सुविधा देण्यात कमला कॉलेजने बाजी मारली आहे. ग्रंथालयतील बुक बॅंकमुळे गरजू विदयार्थीनींना सर्व पुस्तके वर्षभर घरी अभ्यासासाठी दिली जातात. एकूण पुस्तके ४५६८४ हजार इतकी असून पाठ्यपुस्तकांसह ६८ नियतकालिके, व विविध भाषांमधील १० वर्तमानपत्रे घेतली जातात. कॉलेजच्या लायब्ररीत ऑडिओ व्हिज्युअल कलेक्शन १९४ आहेत. मुलींचे कॉलेज असल्यामुळे मुलींच्या सुरक्षिततकडे पालकांच्या नजरेने पाहणे 'कमला'च्या व्यवस्थापनाचे पहिले उदिष्ट आहे. महिलांच्या शिक्षणाचा विचार करत असताना समाजात शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुलींना शिक्षणाच्या परिघात सहभागी करून घेण्यासाठी कॉलेजमध्ये यशवंतराव चव्हाण मुक्त विदयापीठाचे केंद्रही सुरु करण्यात आले आहे. मुक्त विदयापीठाच्या आदर्श गुणवत्ता प्राप्त अभ्यास केंद्राच्या पुरस्काराने या केंद्राला गौरवण्यात आले आहे. विशेष म्हणजे 'विदयार्थिनींकडून प्राध्यापकांचे मूल्यमापन केले जात असल्याने शिक्षणाचा दर्जा उत्तम राहण्यास मदत मिळते. ७० टक्के हून अधिक गुण मिळवलेल्या मुलींना ७० टक्के विनामूल्य पुस्तके दिली जातात. खेळात राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावर नैपुण्य मिळवणाऱ्या मुलींनाही मोफत पुस्तके दिली जातात. काळाची पावले ओळखून आणि संगणकासोबत जाण्यासाठी बीसीए विभाग सुरु करण्यात आला आहे.

तसेच गृहशास्त्र विभागामध्ये एम.ए. होमसायन्स हा विभागही 'कमला'चे वैशिष्ट्य आहे. कमला कॉलेजमधील विद्यार्थिनींनी विविध क्षेत्रात यश मिळवले आहे. आज नेमबाजीत आंतरराष्ट्रीय किर्ती मिळवणारी तेजस्विनी सावंत ही कमला कॉलेजचीच विद्यार्थिनी आहे. सरकारी वकील म्हणून नाव कमावणारी ॲड. मंजुषा पाटील, कथ्थकमध्ये करिअर करणारी राजश्री मायदेव या कमला कॉलेजच्याच विद्यार्थिनी आहेत.



> मुलीला ॲडमिशन घ्यायची तर कमला कॉलेजमध्येच असा आग्रह धरत जेव्हा पालक कमला कॉलेजमध्ये येतात तेव्हा काकाजी अर्थात व्ही. टी. पाटील यांच्या कार्याचे सार्थक झाले असे वाटते. मुलीने बी. ए., बी. कॉम. किंवा फार तर बी. एस्सी. व्हावे ही संकल्पना आता केव्हाच मागे पडली आहे. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर तिला नोकरी, व्यवसाय किंवा गृहिणी व्हावेसे वाटले तर त्यात ती यशस्वीच झाली पाहिजे याच ध्येयाने कमला कॉलेज भविष्यातही मार्गक्रमण करेल.
>
> **- डॉ. क्रांतिकुमार पाटील**
> **प्राचार्य, कमला कॉलेज.**